# जिल्हा परिषद,अमरावती

क्रमांक:जिप/मुकाअ/स्वी.स./१३७/१६
दिनांक:- १ ऑक्टोबर, २०१६

प्रति,

ग्रामसेवक............(सर्व)
ग्रामविकास अधिकारी......(सर्व)

**मार्फत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती..........(सर्व)**

**नमस्कार.....,**

आपल्या अमरावती जिल्हयात मी रुजु होऊन सुमारे १ महिन्याच्या वर कालावधी झालेला आहे.महिन्याभराच्या या अनुभवामध्ये माझ्या असे निदर्शनास आले आहे की,ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हा विकास प्रशासनाचा हा महत्त्वपूर्ण घटक असुन या घटकाला आवश्यक ते नेतृत्व व मार्गदर्शन देण्याची जवाबदारी माझी व सर्व गट विकास अधिकारी यांची आहे.आपल्या सर्वाच्या सहकार्याने या जिल्हयातील ग्रामपंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषद या तीनही पातळयांवर सुप्रशासनाचा वस्तुपाठ आपण सिध्द करु असा मला विश्वास वाटतो.

पंचायत राज प्रणालीमध्ये ग्रामपंचायत हा घटक मानुन ग्रामिण विकासाच्या सर्वच योजना उदा. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना,स्वच्छ भारत मिशन,१४ वा वित्त आयोग,अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा विकास,पंतप्रधान आवास योजना ईत्यादी महत्त्वाच्या योजना हया ग्रामपंचायतीमार्फतच राबविल्या जातात व हया योजना प्रभावीपणे राबवुन यशस्वी करण्यास ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक हयांचे फारमोठे योगदान आहे असे माझे मत आहे.तेव्हा आपण सर्व जिल्हापरिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचे १०० टक्के उधिष्ट साध्य करण्याचे दृष्टीने आज पासुनच कामाला लागाल व जिल्हयाचा नावलौकीक वाढवाल याची मला खात्री आहे.

तसेच ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांचे दफ्तर चांगले असणे अतिशय महत्त्वाचे आहे हे आपल्याला माहिती आहे.अनेक कारणांमुळे आपल्या कडील अभिलेख व आपले दफ्तर अद्यावत नसण्याची शक्यता आहे.म्हणुनच माझी आपणाकडुन अशी अपेक्षा आहे की,येत्या दिवाळीपर्यंतच्या कालावधीपर्यंत आपण आपल्या कडील दफ्तर (नमुने १ ते ३३) अद्ययावत करुन ठेवावे.दिवाळी नंतर सोईस्कर वेळेला पूर्ण जिल्हयातील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या दफ्तर तपासणीची मोहीम आपल्या सहकार्याने हाती घेण्याचा मानस आहे.तरी याबाबत आपण योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावर कराल अशी मी अपेक्षा बाळगतो.

शुभेच्छांसह.....

(डॉ.किरण कुलकर्णी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अमरावती

प्रत-

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि.प.अमरावती यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस.
२) गट विकास अधिकारी पंचायत समिती ----------------(सर्व) यांना उचित कार्यवाहीस.